Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-9 | March-2014 Available online at www.aygrt.isrj.net

भाषिक कौशल्य : एक आकलन

अनिल गर्जे
गांधी महाविदयालय कडा

सारांश - भाषा म्हणजे ध्वनींचा समूह. या ध्वनींचा उपयोग मानवाने मानवी व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी केला. भाषा ही मानवी व्यवहाराचे मुख्य साधन ठरलेली आहे. मानवी मुखातून निघणा-या ध्वनींना व्यवहारोपयोगी अर्थ देणे, ध्वनींना अर्थ संकेत देणे हे मानवाच्याबाबतीत शक्य आहे. इतर प्राण्यांना ते शक्य नाही. म्हणूनच मानव हा 'बोलणारा प्राणी आहे'[१] असे म्हटले जाते.

प्रस्तावना-

बोलणे, लिहिणे आणि वाचणे या सर्व प्रक्रिया भाषेतुनच उदयास आल्या आहेत. ध्वनींना क्रम देऊन त्यात अर्थ भरणे यात मानवाची कल्पकता दिसून येते. त्यामुळे मानवी जीवन आनंददायी होण्यास भाषेचा मोठा वाटा आहे. माणसांनी भाषिक कौशल्य आत्मसात करुन भाषण, संभाषण, संवाद, लेखन, वाचन यामध्ये प्रगती केली. भाषेचे स्वरुप स्पष्ट करताना चं. द. इंदापूरकर म्हणतात, "अभिव्यक्ती आणि अन्योन्य संदेशन यांच्यासाठी उपयोगात आणली जाणारी यादृच्छिक मौखिक प्रतीकांची व्यवस्था म्हणजे भाषा."[२] इंदापूरकर यांचे मत योग्य आहे कारण संकेत प्रणालीच्या आधारे संदेशन साधणे हे भाषेचे प्रमुख लक्षण असते.

बोलणे :

मानवी भाषा अस्तित्वात येण्यापूर्वी मानवाने अंगिक हावभावाच्या भाषेचा उपयोग करुन मनातील भाव-भावनांना वाट मोकळी करुन दिली. हातवारे, नेत्रविक्षेप, अंगविक्षेप, मुद्राविक्षेप यांच्याद्वारे मनातील भाव दुस-या व्यक्तींजवळ प्रकट केले असले पाहिजेत असे भाषावैज्ञानिकांचे मत आहे. याबाबत भाषाशास्त्रज्ञ कृ.पां. कुलकर्णी म्हणतात, "ध्वनीमधील अर्थवहनाचे सामर्थ्य प्रतीत होण्याच्या पूर्वीच्या अवस्थेत आदय मानव हावभाव भाषेचा अंगविक्षेप भाषेचा उपयोग करीत होता. आपले हात, बोटे, डोळे वगैरे अवयवांच्या सहाय्याने तो संदेशनवहन प्रक्रिया करीत होता. म्हणजे आदय मानव मुखयंत्राच्या सहाय्याने न बोलता हाताने, डोळ्याने, मुद्रेने बोलत होता, तोंडाने नाही."[३]

या भाषिक संदेशनात अनेक अडचणी होत्या. अंधार हा सर्वात मोठा अडथळा होता. हे भाषिक संदेशन केवळ प्रकाशातच शक्य होते. शिवाय ज्यांच्याशी हे संदेशन साधावयाचे ती व्यक्ती डोळस असणे आवश्यक आहे.

प्राथमिक अवस्थेत भाषेचा स्त्रोत हावभावांचा होता. त्यानंतर प्रगत भाषा ही ध्वनींची भाषा होय. मानवाने ध्वनींना संकेत देऊन मानवी व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी भाषेला मूर्त रुप दिले. त्यामुळे अडथळे दूर झाले. मानवी व्यवहार सुकर झाला. भाषा ही मानवी भावभावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे माध्यम बनली. अन्न, वस्त्र, निवारा या गरजाप्रमाणेच भाषा ही सुध्दा मानवाची मूलभूत गरज बनली. सामाजिक, सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन भाषेद्वारे होते. संक्रमण, संस्कार आणि दैनंदिन मानवी व्यवहार भाषेमधून होत असल्याने भाषेला कृती आणि उक्तीचे रुप प्राप्त झाले आहे. भाषेमुळेच मानवाने आपल्या जीवनात आमूलाग्र क्रांती घडवून आणली आहे. भाषा ही मानवी जीवनविकासातील अपरिहार्य बाब बनली आहे.

श्रवण :

भाषिक संदेशनात बोलण्याइतकेच श्रवणासही महत्त्व आहे. बोलणा-याचे नीट श्रवण झाले नाही तर भाषिक संदेशनात अडथळे निर्माण होतात. गुंतागुंत वाढत जाते. बोलणा-याचे ऐकण्यासाठी श्रवण इंद्रिय सक्षम असावे लागते. तरच भाषिक संदेशन सुरळीत होईल. या संदेशनात वक्ता आणि श्रोता दोघेही एक भाषिक असणे आवश्य आहे. या संदेशनात संवादाच्या पूर्ततेसाठी वक्ता आणि श्रोता यांना भाषेच्या मुळांशी असलेल्या संकेतव्यवस्थेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. या संकेतांमध्ये फरक पडला तर, संदेशनात अडथळा निर्माण होतो. "डोईचा पदर खांदयावर येणे' या विधानामागचे संकेतच ऐकणा-या श्रोत्याला समजा तो युरोपीय असेल - माहीत नसतील तर संदेशन पूर्ण होणार नाही. कर्णेद्रियातील दोषामुळे अनुकरणात अपूर्णता राहते. ऐकणा-यांचे कर्णेद्रिय सक्षम असतील तरच बोलणा-याच्या मनातील भाव , विचार कळतील.

लेखन :

उच्चारण आणि लेखन ही भाषेची दोन रुपे आहेत. उच्चारण हा भाषिक व्यवहाराचा कणा आहे. उच्चारांचे अस्तित्व क्षणिक असल्याने ते नष्ट होऊ नये म्हणून त्यांना 'चिन्ह' दिले गेले. या प्रक्रियेतुनच भाषेचे लेखन सुरु झाले. लेखन हे उच्चाराचे प्रतिरुप आहे. उच्चारित भाषेचे 'दृश्यरुप' म्हणजे लिपी किंवा 'लेखन' होय. उच्चारांचे लेखन करताना अनेक अडथळे येतात. उच्चारणातील अनुताप, माधुर्य, काठीण्य, सुरावली, आवाजातील व्यक्तीविशिष्टता इ. घटक लेखनात आणणे अशक्य आहे. यामुळे उच्चार आणि लेखनात फरक पडतो. उच्चाराप्रमाणे लेखन असेलच अशी खात्री देता येत नाही. लेखनाचा कल प्रमाणभाषेकडे असतो. भाषा ही एकजिनसी व्यवस्था नसल्याने उच्चार आणि तिचे लेखन यामध्ये एकत्व आणि कार्यकारणभाव असत नाही.

मुखावाटे उच्चारले जाणारे सर्वच्या सर्व ध्वनी लिपीबध्द केले जात नाहीत. भाषिक उच्चारात परंपरने जे ध्वनी समाविष्ट असतात त्यांनाच चिन्हे दिली जातात. भाषेतील सर्व अर्थपूर्ण उच्चारास चिन्ह लेखन देणे शक्य नाही. 'वाड्.मय ', 'सिंह' हे शब्द आपण उच्चारतो वेगळे आणि लिहितो वेगळे. इंग्रजीतील 'ॲ, ऑ' हे स्वर मराठीने स्वीकारल्यामुळे लेखनात फरक पडत गेला. उदा. लार्ड, क्यानडा, आगस्ट, आक्टोबर हे शब्द लॉर्ड, कॅनडा, ऑगस्ट, ऑक्टोबर या पध्दतीने अलिकडच्या काळात लेखन होते. तसेच दैनंदिन व्यवहारात आपण जे बोलतो त्याचे लेखन करताना मात्र वेगळ्या पध्दतीने केले जाते.

लेखनामुळे मौखिक रुपातील साहित्य ग्रंथरुपाने बंदिस्त करता आले. रामायण, महाभारत, गीता यासारखे ग्रंथ लिपीमुळे चिरंतन ठरले आहेत. लेखनाच्या सोयीमुळेच जुनी ग्रंथसंपदा अभ्यासणे शक्य झाले आहे. जेवढे लेखन सोपे आणि उच्चारानुसार होईल. तितक्या अडचणी कमी होतील.

थोडक्यात , चटकन हवेत विरुन जाणे आणि दूरवर ऐकू न येणे या ज्या ध्वनीच्या मर्यादा आहेत, त्या लेखनामुळे नाहीशा झाल्या आहेत.

वाचन :

वाचन हे एक कौशल्य आहे. शब्दांचा अर्थ समाजावून घेणे म्हणजे वाचन होय. वाचनकौशल्यात अनेक उपकौशल्य समाविष्ट आहेत. वाचन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. संवेदना, अवबोध, अर्थग्रहण, उपयोजन या चार प्रक्रिया वाचनात परस्परात गुंफलेल्या असतात. भाषेत लिहिलेले वाचता आले, अर्थग्रहण झाला तर माणसाचे ज्ञान वृध्दिंगत होऊन प्रगती होईल. 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण आपल्याकडे परिचित आहे. वाचनामुळे माणूस सर्वज्ञ होतो. वाचनामुळे माणसाला अनेक संधी चालून येतात. व्यक्तिमत्वविकास, सत्य - असत्य, जागतिक घडामोडी, दैनंदिन प्रगती, व्यावहारिक उलाढाली इ. चे ज्ञान प्राप्त होते. शेवटी वाचन ही एक कला आहे. ती आत्मसात केली तर मानवाची अधिक प्रगती होईल.

अशा प्रकारे बोलणे, लिहिणे, श्रवण आणि वाचन ही भाषेची भाषिक कौशल्ये आहेत. यामुळे अनेकविध पातळयांवर भाषेच्या व्यवहारांचे स्वरुप समजते.

संदर्भ ग्रंथ :

१. मराठी भाषा : व्यवस्था आणि अध्यापन, इंदापूरकर चं. द. कॉन्टिनेन्टल, पुणे, १८८९
२. मराठी भाषा : उद्‌गम व विकास, मॉडर्न, पुणे, १९६३
३. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान, डॉ. महेंद्र कदम, स्नेहवर्धन, प्रकाशन, पुणे, २००३
४. मराठी भाषा विकास संवर्धन व भाषिक कौशल्य, डॉ. नरेंद्र मारवाडे, डॉ. सरकटे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१०
५. आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, डॉ. दादा गोरे
६. वाचन : दिशा आणि दृष्टिकोन, डॉ. नवनाथ तुपे.
७. सुलभ भाषाविज्ञान, डॉ. द. दी. पुंडे